**प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० (PMKSY २.०) अंतर्गत पाणलोट समिती (WC) स्थापन करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्र. केंपुयो २०२२/प्र.क्र.०७/जल-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०६ जुलै, २०२२.

वाचा :- १. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. एपाव्य २०१२/ पत्र क्र. १०४/ जल ८ सद. २७ सप्टेंबर २०१२
२. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. एपाव्य २०१२/ पत्र क्र. १०४/ जल ८ सद. १९ ऑक्टोबर २०१२

**प्रस्तावना:-**

विविध विभागामार्फत करण्यात येणाऱ्या जल संधारण उपचारात एकसूत्रता आणण्याकरीता केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूसंसाधन विभागाने सामाईक मार्गदर्शक सूचना २०२१ निर्गमित केलेल्या आहेत. त्यामध्ये परि. क्र १३.२ अन्वये ग्रामसभेस पाणलोट समितीचे स्थापना करण्याचे अधिकार दिले आहेत.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० कार्यक्रमातील एकूण रकमेपैकी ७७ टक्के (४७+१५+१५) रक्कम गावातील मत्ताहीनासाठी फिरता निधी देणे, सुक्ष्म उद्योग व व्यवसाय विकास, नैसर्गिक संसाधनाचे व्यवस्थापन, गावातील कामे किंवा पाणलोट प्रकल्पातील उपचारावर खर्च होणार आहे. पाणलोटाच्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (Detailed Project Report: DPR) विहीत उपचारांसाठी आवश्यक रक्कम पाहता, पाणलोटाच्या पूर्ण विकासासाठी सदर रक्कम पुरेशी होत नाही. त्यामुळे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० कार्यक्रमांमध्ये (PMKSY WDC २.०) अभिसरणाद्वारे (Convergence) अन्य राज्य व केंद्रीय योजनांशी सांगड घालून अन्य योजनेतून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना -पाणलोट विकास घटक २.० साठी पूरक निधी मिळविणे फायदेशीर ठरणार आहे. त्यासाठी गावातील/ग्राम पंचायतीतील सदस्यांना पाणलोट समितीवर घेणे आवश्यक आहे. त्याद्वारे अभिसरणाची प्रक्रिया सुलभ होईल व ग्राम पंचायतीमार्फत अन्य योजनेद्वारे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० साठी पूरक निधी मिळून ग्रामपंचायत / गावाचा विकास साधला जाईल. त्यासाठी प्रत्येक पाणलोट समितीवर ३-४ ग्रामपंचायत सदस्यांची निवड करण्यात यावी हि बाब विचाराधीन होती. केंद्र शासनाच्या सामाईक मार्गदशक सूचनेनुसार प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत पाणलोट समितीची रचना निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूसंसाधन विभागाने सामाईक मार्गदर्शक सूचना २०२१ निर्गमित केलेल्या आहेत. त्यामध्ये परि.क्र.१३.० अन्वये ग्रामसभेस पाणलोट समितीची स्थापना करण्याचे अधिकार दिले आहेत. सदर समितीचे सोसायटी नोंदणी नियम, १८६० प्रमाणे धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी करण्यात येते. वैकल्पिकरित्या, पाणलोट समितीची स्थापना ग्राम सभेद्वादे सरपंचाच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतीची उपसमिती म्हणून केली जाईल. अशा परिस्थीतीत सोसायटी नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत कोणत्याही नोंदणीची आवश्यकता नाही. पाणलोट समितीची कार्ये पाहता, पाणलोट समितीस अधिक बळकटी देण्याकरिता व जलसंधारण कामांची व्यवस्थितरित्या/प्रभावी अंमलबजावणी कोण्याच्या दृष्टीने, सरपंच, ग्रामपंचायत यांनाच पाणलोट समितीचे अध्यक्षपद सोपविणे श्रेयस्कर आहे.

त्यानुसार यापूढे राज्यातील प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० राबविणा-या ग्रामपंचायतीच्या पाणलोट समितीवर अध्यक्ष म्हणून सरपंच, ग्रामपंचायत हे काम पाहतील असा शासनाने निर्णय घेताल आहे.

**२. या निर्णयानुसार पाणलोट समितीची सुधारित रचना खालील प्रमाणे:**

१. पाणलोट समिती (WC) : अध्यक्ष : सरपंच , ग्रामपंचायत
२. पाणलोट समितीचे प्रगतशील महिला शेतकरी समितीच्या बैठकीमध्ये निवडण्यात आलेली सहअध्यक्ष
३. पाणलोट समितीचे ३ सदस्य : ग्राम पंचायतीचे सदस्यामधून
४. पाणलोट समितीचे ३ सदस्य : शेतकरी उत्पादक संघटना (FPO)/ कंपनी / गट सदस्यामधून
५. पाणलोट समितीचे ५ सदस्य : स्वयं सहाय्यता गटामधून व उपभोक्ता गटामधून (महिला सदस्य किमान १ व अनुसूचित जाती/ अनुसुचित जमाती समूह किमान १
६. पाणलोट समितीचे १ सदस्य : पाणलोट विकास गटाचा - शासकीय / स्वंयसेवी संस्था पी. आय. ए. प्रतिनिधी
७. पाणलोट समिती सचिव : ग्राम सभेने ठराव करुन निवडलेला प्रतिनिधी

**३. कार्यपद्धती :-**

१. पाणलोट समितीच्या अध्यक्षांचा कालावधी हा त्यांच्या सरपंच पदाच्या कालावधी एवढा राहील.
२. पाणलोट समितीमधील ग्राम पंचायतीचे सदस्य यांचा कालावधीही त्यांच्या सदस्य पदाच्या कालावधी एवढाच राहील
३. सदर शासन निर्णय तात्काळ अमलात येत असून ज्या पाणलोट समित्यांचे अध्यक्षपदी सरपंचा व्यतिरिक्त ग्रामसभेने निवडलेली ग्रामपंचायती मधील अन्य व्यक्ती असतील त्या गावातील पाणलोट समित्यांचे त्यांचे अध्यक्षपद तात्काळ संपुष्टात येईल.
४. ज्या गावात पाणलोट समितीचे अध्यक्ष हे सरपंच आहेत अशा पाणलोट समितीच्या अध्यक्षपदी सरपंच हे त्यांच्या पदाच्या कालावधी पर्यंत तसेच कायम राहतील
५. पाणलोट समिती, अध्यक्ष व सचिवासह १५ सदस्यांची असेल.
६. पाणलोट समिती ही ग्रामविकास समितीची / ग्राम पंचायतीची उपसमिती म्हणून कार्य करेल
७. ज्या पंचायतीमध्ये एकापेक्षा अधिक गावे आहेत, ती ग्राम पंचायत संबंधित गावामधील पाणलोट विकास प्रकल्पाची व्यवस्था करण्यासाठी प्रत्येक गावाकरिता स्वतंत्र उपसमिती स्थापन करील.
८. ज्या ठिकाणी पाणलोट प्रकल्पामध्ये एकापेक्षा जास्त ग्राम पंचायतीचा समावेश होतो, त्या ठिकाणी प्रत्येक ग्राम पंचायती करिता स्वतंत्र पाणलोट समिती स्थापन करण्यात येईल.
९. पाणलोट समितीचे अध्यक्ष यांच्याकडून कर्तव्यात कसूर, दुर्लक्ष, योजनेच्या अंमलबजावणीत मंद गती, योजनेत अफरातफर, गैर व्यवहार आढळल्यास, चौकशी अंती अध्यक्षास पदावरून काढून टाकण्याचे अधिकार मुभाबी ग्राम पंचायत अधिनियम १९५८ कलम ३९ नुसार विभागीय आयुक्त तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे यांना राहतील.
१०. पाणलोट समितीचे अध्यक्ष दीर्घ आजारी पडल्यास अथवा शारीरिकदृष्ट्या अकार्यक्षम झाल्यास उपसरपंच हे पाणलोट समितीच्या अध्यक्ष पदाची कामे पाहतील
११. पाणलोट समितीची बैठक दरमहा घेण्यात यावी.

**४. पाणलोट समितीची कार्ये :-**

**पाणलोट समिती ही या प्रकल्याच्या अंमलबजावणीची धुरा खांद्यावर असणारी सर्वात महत्वाची लोक सहभाग असणारी सभा आहे.**

१. नियोजन व अंमलबजावणीमध्ये प्रकल्पात सक्रिय जन सहभाग व त्यांची भागीदारी सुनिश्चित करणे

२. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांचे प्रकल्प नियोजन नेट प्लॅनिंग द्वारे करून, प्रकल्प आराखडे तयार करण्यास मृद व जलसंधारण विभाग/ कृषी/ वन विभाग/ सामाजिक वनीकरण/ संबंधित शासकीय विभाग, स्वयं सेवी संस्था (NGO), पाणलोट विकास पथकास आणि प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणास पाणलोट समिती सहाय्य करेल.

३. सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (DPR) मंजूर उपचार कामांची अंमलबजावणी करणे. राज्य सरकारने वेगवेगळ्या पायाभूत सुविधांच्या कामांसाठी ठरविलेल्या दरांचे वेळा पत्रकानुसार मंजूर केलेल्या खर्चाच्या नियमांचे पालन करणे. लाभार्थी उप क्रमांच्या बाबतीत योजने अंतर्गत विहित केलेले दर सर्व सामान्य असतील.

४. नेमलेल्या बँकांपैकी एका बँकेत zero balance असलेले जोड खाते उघडणे आणि त्याची देखरेख करणे, तसेच खातेदारांच्या जोड स्वाक्षरीने ते चालविणे.

५. सामाईक मार्गदर्शक सूचनेनुसार मंजूर झालेला निधी बँक खात्यात प्राप्त करण्यासाठी आणि खर्च केल्यानंतर पुढील सादरीकरणासाठी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणे (PIA) कडे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर करणे.

६. पाणलोट कामांची देखभाल व दुरुस्ती करणे, केल्या जाणाऱ्या कामांच्या नोंदी करणे व संपूर्ण अभिलेख जतन करणे, हिशोब ठेवणे या कामाची जबाबदारी सदर समितीची राहील.

७. मत्ता व्यवस्थापनाच्या नियोजनासाठी नैसर्गिक संसाधनाचा वार्षिक लेखा ठेवणे पाण्याचा सुयोग्य वापर होण्याच्या दृष्टीने वर्षातून दोनदा उपलब्ध पाण्याचा ताळेबंद (Water budgeting) मांडणे.

८. गरजेनुसार निधीची मागणी करणे - पाणलोट विकासाची कामे जलदगतीने पूर्ण करणे.

९. प्रत्येक महिन्यात झालेल्या कामाचा तपशील व खर्च ग्राम सभेसमोर सादर करणे.

१०. समितीच्या लेख्यांचे वार्षिक विवरण व कामकाज दैनदिन सोयीसाठी स्वतंत्रपणे ठेवण्यात यावे.

११. वितरीत निधी मधून पाणलोट विकासाची कामे (NRM) वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे करण्यात यावीत. पाणलोटांतर्गत झालेल्या कामाची देयके वेळेत अदा करण्याची जबाबदारी पाणलोट समितीची राहील.

१२. पाणलोट समितीला मृद व जल संधारण तसेच वनीकरण कामातील नियोजन व अंमलबजावणी सल्ला/ मदतीसाठी गरजेनुसार संबंधीत शासकीय यंत्रणेचे (कृषी, वने, लघु पाटबंधारे इत्यादी) निमशासकीय यंत्रणा / जिल्हा परिषदेचे ग्रामस्तर अधिकारी/ कर्मचारी विशेष आमंत्रित म्हणून पाणलोट समितीत सहभागी करण्यात येईल. परंतु संबंधित विशेष निमंत्रितांना मतदानाचा अधिकार राहणार नाही.

१३. विविध उपभोक्ता गट व स्वयं सहाय्यता गट तसेच शेतकरी उत्पादक संघटना/ कंपनी /गट यांच्या मदतीने लोक सहभागाचे क्षमता बांधणी व लक्ष्य केंद्रित करणे. वरील समूह ग्राम पंचायतीच्या मदतीने कृती आराखड्या द्वारे तयार केलेल्या किंवा विकसित केलेल्या विविध मालमत्ता आणि संसाधनाशी संबंधित नियमक मापदंड लागू करेल.

१४. पाणलोट समिती, पाणलोट विकास पथकाच्या सहाय्याने शेतकरी, भूमिहीन / मत्ता नसलेले गरीब कृषी मजूर, स्त्रिया, धनगर, व अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीच्या व्यक्तीमधून पाणलोट क्षेत्रामध्ये स्वयं सहाय्यता गट (Self Help Group: SHG) स्थापन करेल. हे गट एकजिनसी गट असतील व त्यांची ओळख व हित संबंध सामाईक असतील ते त्यांच्या उपजीविकेकरिता पाणलोट क्षेत्रावर अवलंबून असतील.

१५. पाणलोट समिती, पाणलोट विकास पथकाच्या सहाय्याने पाणलोट क्षेत्रामध्ये उपभोक्ता गटांची (User Groups: UG॰s) देखील स्थापना करण्यास सहभाग घेईल. प्रत्येक काम / कार्यक्रमामुळे जास्त प्रमाणात बाधीत झालेल्या आणि पाणलोट क्षेत्रामध्ये जमीन असलेल्या व्यक्तींचे हे एकजिनसी गट असतील. प्रत्येक उपभोक्ता गटामध्ये विशिष्ट पाणलोट क्षेत्रातील काम अथवा कार्यक्रम या पासून ज्यांना प्रत्यक्ष फायदा होण्याची शक्यता आहे अशा व्यक्तींचा समावेश असेल. प्रकल्पातर्गत निर्माण झालेल्या सर्व मत्तांच्या प्रवर्तनासाठी व देखभालीसाठी ग्रामपंचायत व ग्रामसभा यांच्या सहयोगाने उपभोक्ता गट जबाबदार असेल.

१६. प्रकल्पातर्गत वेगवेगळ्या केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची सांगड (Convergance of Scheme) घालण्यासाठी पाणलोट समिती समन्वय / सहभाग घेईल.

१७. आर्थिक वर्षाच्या शेवटी, प्रकल्प बहिर्गमन नंतर निर्माण झालेल्या मालमत्तेचे ग्राम पंचायतीकडे हस्तांतरण करणे. तसेच वेळोवेळी मालमत्ता आणि कामांची तपासणी करण्यात सक्रीय सहभाग घेईल आणि आवश्यकतेनुसार त्यांची दुरुस्ती, देखभाल व सुधारीकरण सुनिश्चित करेल. यासाठी ग्राम पंचायती अंतर्गत सुरु असलेल्या योजनामध्ये उपलब्ध निधी तसेच पाणलोट विकास निधी (WDF) याचा उपयोग केला जाऊ शकतो.

**५. पाणलोट समिती सचिवांच्या जबाबदाऱ्याबाबत :**

**उपरोक्त जबाबदाऱ्या पार पाडण्यास सक्षम अशा स्थानिक पात्र व्यक्तीची ग्रामसभा पाणलोट समिती सचिव म्हणून नेमणूक करील. सचिव हा पाणलोट समितीच्या अध्यक्षांच्या नियंत्रणाखालील पूर्णवेळ सदस्य म्हणून काम पाहील.**

१. पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाच्या संदर्भातील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरिता ग्रामसभा आयोजित करण्यासाठी ग्रामसेवकास कळविणे. पाणलोट समितीच्या प्रत्येक बैठकीमध्ये मागील खर्चाचा आढावा, झालेला खर्च योग्य आहे का याची तपासणी बँक खाते पुस्तकावरून करणे, तसेच झालेला खर्च व नोंदविलेला खर्च बरोबर आहे का याबाबतचे सर्व दस्तावेज पाणलोट समितीच्या बैठकीत सादर करून प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांना उपलब्ध करून देणे. पाणलोट समिती बैठक बोलविण्यासाठी सभेची नोटीस ८ दिवस अगोदर काढणे.

२. बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने कार्यवाही बाबत सतत पाठपुरावा व समन्वय करणे.

३. पाणलोट समिती (Watershed Committee) व पाणलोट विकास प्रकल्पाकरिता असलेल्या इतर संस्था यांच्या बैठकीमधील कार्यवाही बाबतचे सर्व अभिलेखे अद्यावत ठेवणे.

४. वित्तीय व्यवहारांची पारदर्शकता ठेवून नोंद करणे.

५. पाणलोट समितीच्या वतीने पाणलोट विकास पथकातील मृद व जलसंधारण / कृषी/ सामाजिक वनीकरण/ वन/ स्वयंसेवी संस्था प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांनी निर्देशित केलेल्या व्यक्ती बरोबर रेखांकित धनादेशावर संयुक्त स्वाक्षरी करणे.

६. कामाची आखणी करणे, कामे करून घेणे व कामावर देखरेख ठेवणे.

७. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या सूचने प्रमाणे राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पातील कामांची अंमलबजावणी करणे. तसेच आवश्यक ती माहिती व्यवस्थापन प्रणाली (एमआयएस) तील माहिती प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांना दरमहा पहिल्या आठवड्यात जबाबदारी पूर्वक अद्यावतीकरणासाठी उपलब्ध करून देणे.

८. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या निर्देशानुसार सचिव कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये भाग घेईल.

९. उपभोक्ता गट (UG॰s), स्वयं सहाय्यता गट (Self Help Group: SHG) व शेतकरी उत्पादन संघटना (Farmer Producer Organization) त्यांचे लेखे ठेवण्यास मदत करणे.

१०. लेखाविषयक ठरवून दिलेले सर्व दस्ताऐवज अद्यावत ठेवणे, तसेच पाणलोट समिती कार्यालयास सचिव हा पूर्ण जबाबदार असेल.

११. ग्राम पंचायतीमध्ये झालेल्या सर्व कामांचे, तसेच हस्तांतर केलेली मालमत्ता यांची नोंद ठेवणे.

सचिव यांनी गैरवर्तन/ गैरप्रकार/ बेजबाबदार वर्तन केल्याचे दिसून आल्यास किंवा काम समाधानकारक नसल्यास त्यांना कामावरून काढून टाकण्याचा अधिकार पाणलोट समितीस राहील. गैरवर्तन करणाऱ्या पाणलोट समिती सचिवावर पाणलोट समिती कारवाई करीत नसेल तर प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण (PIA) पाणलोट समिती सचिवावर कारवाई करण्यास सक्षम राहील.

**६.** योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन स्तरावरून आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येतील. तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०२१ त्यानुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजना राज्यात कार्यरत राहील. सदर शासन निर्णय केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनास अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

**७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०७०६१६५१३१८७२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yogita Sanjay Desai

Digitally signed by Yogita Sanjay Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Soil And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bbd04a10febeb3c8b6cfa99da6ee3ed9c632fd0058158c3a11cb86e163b25ad4, serialNumber=d710fd63609eb92c2378f60caa448330b002f85bdf614f42e8ec543ce60c3951, cn=Yogita Sanjay Desai
Date: 2022.07.06 17:50:50 +05'30'

**( योगिता देसाई )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल,महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव
२. मा. मुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधीपक्ष नेता (विधान परिषद) विधानमंडळ, मुंबई यांचे कार्यालय.
५. मा. विरोधीपक्ष नेता (विधान सभा) विधानमंडळ मुंबई यांचे कार्यालय.
६. मा मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
७. मा राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
८. सचिव (जलसंधारण ), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सर्व सहसचिव/ उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. आयुक्त (मृद व जलसंधारण, औरंगाबाद ) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा , महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन , महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व )
१४. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (सर्व )
१५. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग (सर्व )
१६. निवड नस्ती जल (८), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.